
# महाराष्ट्र शासन

## कार्यकारी अभियंता,
## सार्वजनिक बांधकाम विभाग,क्र.२.सोलापूर.
## जिल्हा- सोलापूर .

दुरध्वनी क्र.०२१७/२३१२३०२
फॅक्स क्र.०२१७/२३१५३८८

**email address : solapur2.ee@mahapwd.com**

# नागरिकांची सनद



# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ४ ते ५ |
| २ | नागरिकांची जबाबदारी | ६ |
| ३ | कार्यालयाची रचना | ७ ते ८ |
| ४ | अ- कार्यपुर्तीचे वेळापत्रक | ९ |
| ५ | ब- माहितीची सुलभता, खाजगीकरण | १० |
| ६ | क- गा-हाणी/तक्रारी यांचे निराकरण | ११ |
| ७ | ड- नागरीकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन | १२ |
| ८ | इ- जनसामान्यांकडून सुचना | १२ |
| ९ | ई- नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी | १३ |
| १० | विभागीय कार्यालयातील वेगवेगळया शाखांची कामे प्रकल्प शाखा | १४ ते १५ |
| ११ | बांधकाम ठेकेदार नोंदणी | १६ |
| १२ | रेखाशाखा | १७ |
| १३ | भाडे प्रकरण | १७ |
| १४ | मुल्यांकन प्रस्ताव | १७ |
| १५ | सिनेमा/व्हीडीओ/सर्कस यांची वार्षिक तपासणी | १७ |
| १६ | स्टेज परवानगी | १७ |
| १७ | जमीन बिगरशेती करणेबाबत ना हरकत प्रमाणपत्र | १८ |
| १८ | पाईपलाईन क्रॉसिंग प्रस्ताव | १८ |
| १९ | केबल क्रॉसिंग प्रस्ताव | १८ |
| २० | जोडरस्ते प्रस्ताव (पेट्रोल पंप/ढाबे/हॉटेल्स इ.) | १८ |
| २१ | रस्त्यांच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | १८ |
| २२ | सरकारी इमारतीचे ना उपलब्धता प्रमाणपत्र | १८ |
| २३ | अंतराचे दाखले | १८ |

| | | |
|---|---|---|
| २४ | लेखा शाखा कामाचे स्वरुप व जबाबदारी | १९ |
| २५ | निविदा निश्चितीबाबत कार्यवाही | २० ते २२ |
| २६ | उपविभागाचे लेखा परिक्षण व देयकांची पडताळणी | २३ |
| २७ | लेखा परीक्षण | २३ ते २५ |
| २८ | विभागीय कार्यालयातील आस्थापना शाखेची कामे | २६ |
| २९ | विश्रामगृह/विश्रामधाम आरक्षणाबाबतची माहिती | २७ ते २८ |
| ३० | शासकीय विश्रामगृहाची माहिती | २९ |
| ३१ | गृहवाटप समिती व उपसमितीचे कामकाज | ३० |
| ३२ | माहिती अधिकार अधिनियम -२००५ | ३१ |
| ३३ | भांडार शाखा | ३२ ते ३३ |
| ३४ | कार्यपुर्तीचे वेळापत्रक | ३४ ते ३७ |
| ३५ | उपविभागीय कार्यालयाची माहिती | ३८ |
| ३६ | वृक्ष तक्ता | ३९ |

## प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास सुमारे १५० वर्षाची गौरवशाली परंपरा आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२.सोलापूर हे कार्यालय २१ वर्षापासून कार्यरत आहे.

हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. ही बांधिलकी सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२.सोलापूर या सनदेद्वारे जाहिर करीत असुन, ती स्विकारीत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपुर्वक व सन्मानपुर्वक वागणूक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाईक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन, ही सनद तयार करतांना नजरेसमोर ठेवला आहे.

या कार्यालयामार्फत बार्शी, माढा व मोहोळ हे ३ तालुके येथील शासकीय इमारतींची (निवासी व अनिवासी इमारती) दुरूस्ती व देखभालीची कामे केली जातात. त्या मध्ये पोलीस खात्याची कार्यालये, शासकीय रुग्णालये, प्रशासकीय इमारती त्याच बरोबर बार्शी, माढा,कुर्डूवाडी व मोहोळ येथील विश्रामगृह, इत्यादी इमारतींचा समावेश आहे. तसेच या विभागांतर्गत अर्थसंकल्पीय मुळ बांधकामे / गौण बांधकामे / ठेव अंशदान कामे केली जातात. माननीय खासदार / आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर होणारी कामे केली जातात. सर्व शासकीय कार्यालयांना त्यांचे कामकाजात स्थापत्य विषयक तांत्रिक सल्ला देण्यात येतो. तसेच तातडीच्या प्रसंगी अत्यावश्यक सेवा व इतर काही अतिरिक्त सेवा पुरविल्या जातात.

१) सार्वजनिक ठिकाणी जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तिंसाठी वापरावयाचे मंडप, हेलिपॅड,स्टेज इ. बाबतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करून प्रमाणित करणे.

२) आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकीशी संबंधित आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

३) ठेकेदारांची नोंदणी प्रमाणपत्रे व विविध ना-हरकतीचे दाखले विहित कालावधीत निर्गमित करणे.

४) या कार्यालयात दर सोमवारी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करण्यात येते.

५) **''माहितीचा अधिकार अधिनियम''** अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करून देणे.

६)विभागाच्या कामकाजात सातत्य ठेवुन व आधुनिकता आणून विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

७) **बांधिलकी** : वरिल सर्व कर्तव्य पार पाडताना सार्वजनिक बांधकाम विभाग,क्र.२.सोलापूर हे

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व मदतीची वृत्ती ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

## २) **<u>नागरिकांची जबाबदारी</u>** :

* शासकीय अधिकारी-कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

* नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपुर्णरित्या मिळावीत.

* नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

* विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरू नये.

* सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

* नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करू नयेत.

* रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची जबाबदारी राहिल.

* नागरिकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

## कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२.सोलापूर या कार्यालयाची रचना

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२.सोलापूर कार्यालयाचे अधिपत्याखाली एकूण चार उप विभाग आहेत. विभागीय कार्यालयातील क्षेत्रिय कामे या उप विभागाकडून पार पाडली जातात. कार्यकारी अभियंता हे विभागीय कार्यालयाचे प्रमुख आहेत तर उप अभियंता हे उपविभागाचे कार्यालय प्रमुख आहेत. कार्यकारी अभियंता यांचे

आदेशानुसार उप अभियंता हे उपविभागाकडून कामाची अंमलबजावणी करतात. या उप विभागीय कार्यालयात शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-२ या पदावरील अधिकारी प्रत्यक्ष कामावर जावून देखरेख करतात, खात्याकडून करावयाच्या प्रत्येक कामाची अंदाजपत्रके तयार करुन त्यास मंजूरी मिळाल्यानंतर महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीमध्ये शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार ठेकेदार निश्चित करण्यात येतो, त्यानंतर निविदाशर्तीनुसार काम करुन घेणे, झालेल्या कामाची मोजमापे लिहिणे अशी महत्वाची जबाबदारी या अधिका-यांवर असते. शाखा अभियंता यांनी नोंदवलेल्या मोजमापाची तपासणी करुन कामाची किंमत निर्धारण करण्याची कार्यवाही उप अभियंता यांचे कडून करण्यात येते. कामाची अंदाजपत्रके तयार करुन ती सक्षम प्राधिका-यास मंजूरीसाठी सादर करण्याची जबाबदारी शाखा अभियंता व उप अभियंता यांची असते. या कामासाठी त्यांना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व कुशल / अकुशल कामगार मदत करत असतात. या उपविभागाची नावे / पत्ता व कार्यक्षेत्र विषयीची माहिती सोबतचे **परिशिष्ठ 'अ'** मध्ये दर्शविली आहे.

विभागीय कार्यालयात प्रकल्प शाखा / रेखा शाखा / लेखा शाखा / भांडार शाखा / आस्थापना शाखा अशी शाखावार विभागणी केली आहे, विभागीय कार्यालयाचा वृक्ष तक्ता सोबतचे **परिशिष्ठ 'ब'** मध्ये दर्शविला आहे.

**या शाखांचे प्रमुख अधिकारी / कर्मचारी खालील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र | शाखा | प्रमुख अधिकारी | अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प शाखा | उप कार्यकारी अभियंता | शाखा अभियंता /सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / कनिष्ठ अभियंता (प्रकल्प अभियंता) |
| २ | रेखा शाखा | आरेखक श्रेणी-१ | आरेखक श्रेणी-२/ श्रेणी-३ |
| ३ | लेखा शाखा | विभागीय लेखाधिकारी | वरिष्ठ लिपीक / कनिष्ठ लिपीक |
| ४ | आस्थापना शाखा | प्रथम लिपीक | वरिष्ठ लिपीक / कनिष्ठ लिपीक |
| ५ | भांडार शाखा | भांडारपाल | सहाय्यक भांडारपाल |

विभागीय कार्यालयात उप कार्यकारी अभियंता, विभागीय लेखाधिकारी, भांडारपाल, आरेखक व प्रथम लिपीक हे अधिकारी कार्यकारी अभियंता यांचे सुचनांनुसार काम करतात. उप विभागीय कार्यालयास क्षेत्रिय कामे पार पाडण्यासाठी अंदाजपत्रकांची / निविदा विषयक कागदपत्रांची छाननी करुन त्यास सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करतात. पुर्ण झालेल्या कामांची नकाशे व कागदपत्रावरुन तपासणी करुन मोजमापानुसार केलेले मुल्य निर्धारण तांत्रिकदृष्टया तपासुन अदा करणेसाठी कार्यकारी अभियंता यांची मंजूरी घेतात. या शाखांकडुन करण्यात येणा-या कामाची सविस्तर माहिती स्वतंत्ररित्या स्पष्ट केली आहे.

विभागीय स्तरावर विविध स्वरुपाचे लेखे (**Accounts**) तयार करण्याचे काम विभागीय लेखाधिकारी करत असतात, त्याच बरोबर कार्यकारी अभियंता यांना अर्थिक बाबीशी निगडित असलेल्या प्रकरणी मार्गदर्शन करण्याचे काम हे अधिकारी करतात. भांडारपाल यांच्या कडून विभागीय भांडारासाठी लागणा-या साहित्य खरेदीविषयी कार्यवाही केली जाते. विभागीय कार्यालयाच्या आस्थापना शाखेकडून कर्मचा-यांच्या नियुक्त्या, बदल्या, रजा इत्यादी सेवा विषयक कामे केली जातात. विभागीय कार्यालयातील या शाखांकडून करण्यात येणारी कामे सविस्तररित्या पुढे नमुद केली आहेत.

## (अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक

ठेकेदाराची नोंदणी, विविध ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी लागणारा कालावधी, सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती कार्यपूर्तीचे वेळापत्रकात **(परिशिष्ठ-क)** नमुद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाचे आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित फी भरून संबंधित शाखा प्रमुखाकडे मिळू शकेल.

नैसर्गिक आपत्ति, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इत्यादी उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

## (ब) माहितीची सुलभता

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावरून **(www.mahapwd.com)** तसेच वेळोवेळी प्रसिध्द केले जाणाऱ्या पत्रकाद्वारे जनतेला आकडेवारीचा तपशिल सुलभतेने उपलब्ध होईल. मुख्यत्वेकरुन या संकेतस्थळावर निविदासुचना, परिपत्रके व कार्यालयांची माहिती दिली आहे.

## (ब) खाजगीकरण

विशेषतः शहरीभागाच्या विकासकामासाठी अर्थसंकल्पातून उपलब्ध होणारा अल्पनिधी व काळाची गरज, या कारणामुळे शासनाने विकासकामामध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग **''बांधा, वापरा व हंस्तांतर करा''** या तत्वावर सुरू केला आहे, व त्याप्रमाणे कामांची अंमलबजावणी करण्यात येते.

## (क) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरिकांनी त्यांची गाऱ्हाणी / तक्रार असेल त्या उपविभाग कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ शाखा अभियंता यांचे विरूध्द गाऱ्हाणे / तक्रार असल्यास उपविभाग कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे उप अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे, विभाग कार्यालयातील एखादया अधिकारी / कर्मचा-यांविरूध्द गाऱ्हाणे / तक्रार असल्यास संबधित शाखा प्रमुखाकडे (उप कार्यकारी अभियंता / विभागीय लेखाधिकारी / प्रथम लिपीक / भांडारपाल) गाऱ्हाणे मांडावे. अशा गाऱ्हाणे / तक्रारींचे निराकरण ७ दिवसात करण्यात येईल. गाऱ्हाणे / तक्रारी नोंदविण्यासाठी या कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यात येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने वा **''ई-मेल''** द्वारेही नागरीक मांडू शकतात.

## (ड) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा वेळोवेळी कार्यकारी अभियंता यांच्याकडून घेण्यात येईल.

## (इ) जनसामान्यांकडून सूचना

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सुचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करून, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशिर हक्क निर्माण करित नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## (ई) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक १९/१२/२००९ पासुन करण्यास हा विभाग कटीबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन, नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचित आदर करून आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२.सोलापूर हे कार्यालय खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

## विभागीय कार्यालयातील वेगवेगळया शाखांची कामे खालीलप्रमाणे

प्रकल्पशाखेची माहिती खालील प्रमाणे आहे.

उप कार्यकारी अभियंता हे या शाखेचे प्रमुख असुन त्यांचे नियंत्रणाखालील प्रकल्प अभियंता (शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / कनिष्ठ अभियंता) या शाखेचे कामकाज करतात. उपविभागाकडून अंदाजपत्रके तयार करुन घेणे, त्यांची तपासणी करुन सक्षम प्राधिका-याची मान्यता मिळाल्यानंतर अर्थसंकल्प तरतुद, प्रारुपनिविदा इत्यादी बाबतची कामे या शाखेकडुन केली जातात. बांधकाम ठेकेदाराची नोंदणी देखिल या शाखेकडुन करण्यांत येते, अशी नोंदणी करताना ठेकेदाराची तांत्रिक क्षमता, ठेकेदाराने पुर्ण केलेली व चालु असलेल्या कामाचा दर्जा, वित्तिय क्षमता, अशा सर्व बाबी विचारात घेवून ठेकेदार नोंदणीची कार्यवाही करण्यात येते. बांधकाम ठेकेदारांना शासनाची / स्थानिक स्वराज्य संस्था / केंद्रशासनाची कामे करताना नोंदणीपत्राची आवश्यकता असते.

### १. अर्थसंकल्पिय कामे

दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये जी कामे समाविष्ट होतात त्यांची उपविभागाकडून अंदाजपत्रके / प्रारुप निविदा / देयके इत्यादी प्राप्त होतात. त्याची तपासणी करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येते. तसेच यासाठीचा सर्व पत्रव्यवहार केला जातो.

### २. ठेव अंशदान /गौण बांधकामे

शासनाच्या वेगवेगळया खात्याकडून काही कामे करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे रक्कम वर्ग केली जाते. या कामांची अंदाजपत्रके / प्रारुपनिविदा / देयके इत्यादी तपासली जातात.

## ३. स्थानिक विकास कार्यक्रम

यामध्ये स्थानिक माननीय आमदार / खासदार यांचेकडून सुचविलेली कामे करण्याविषयी जिल्हाधिकारी यांचेकडून निधी वर्ग केला जातो. त्यानुसार उपविभागाकडून प्राप्त अंदाजपत्रके / प्रारुप निविदा / देयके तपासणी इत्यादी कामे करण्यात येतात.

या विभागाकडे प्रामुख्याने शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्तीची कामे केली जातात. वेगवेगळया खात्यांकडून सुचविलेल्या दुरुस्तीमधील किरकोळ दुरूस्ती /विशेष दुरूस्ती / विविक्षित दुरूस्ती इत्यादी प्रकारे वर्गीकरण केले जाते. यापैकी किरकोळ व विशेष दुरूस्तीच्या कामांना मंडळ कार्यालयाकडून तर विविक्षित दुरुस्तीच्या कामांना प्रादेशिक विभाग, कार्यालयाकडून मंजूरी दिली जाते. सदर कार्यक्रम मंजूर झाल्यावर त्याच्या अंदाजपत्रक / प्रारुप निविदा / देयके इत्यादी बाबत तपासणी केली जाते.

काही खाजगी (शासन अनुदानित) संस्थांकडून अंदाजपत्रके तपासण्यासाठी या कार्यालयाकडे येतात. त्यांचे नियमाप्रमाणे शुल्क आकारण्यात येवून अंदाजपत्रके तपासून दिली जातात.

## बांधकाम ठेकेदार म्हणून नोंदणी करणे.

१) सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे नोंदणी वर्ग-अ अंतर्गत प्रमाणपत्र देणे कामी संबंधितांनी आवश्यक कागदपत्राची पूर्तता केल्यावर व पुर्ण किंवा अर्धी फी भरल्यावर सदर प्रकरण मंजूरीसाठी वरिष्ठ कार्यालयास या विभागातून ४ दिवसाचे आत पाठविले जाते व वरिष्ठ कार्यालयाकडून मंजूरी आदेश प्राप्त झालेनंतर ८ दिवसाचे आत प्रमाणपत्र व ओळखपत्र देण्यात येते.

२) नोंदणी वर्ग १ ते ७ **(सुशिक्षित बेरोजगार अभियंता वगळून)** साठीची नोंदणी प्रकरणे या कार्यालयास प्राप्त होतात. या प्रकरणांची छाननी करुन यामधील माहितीची खातरजमा करण्यासाठी संबंधित खात्याकडे / उपविभागाकडे पाठविली जातात.

माहितीची पूर्तता / खातरजमा संबंधित खात्याकडून / उपविभागाकडून प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाचे आत सक्षम प्राधिका-याकडे मंजूरीसाठी पाठविली जातात. या प्रकरणांना मंजूरी प्राप्त झाल्यानंतर व सर्व फी प्राप्त झाल्यानंतर ८ दिवसाचे आत नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते.

३) नोंदणी वर्ग ८ व ९ साठीची नोंदणी प्रकरणे या कार्यालयास प्राप्त होतात.

या प्रकरणाची छाननी करुन यामधील माहितीची खातरजमा करण्यासाठी संबंधित खात्याकडे / उपविभागाकडे पाठविली जातात.

माहितीची पूर्तता / खातरजमा संबंधित खात्याकडून / उपविभागाकडून प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाचे आत सक्षम प्राधिका-याकडे मंजूरीसाठी पाठविली जातात. या प्रकरणांना मंजूरी प्राप्त झाल्यानंतर व सर्व फी प्राप्त झाल्यानंतर ८ दिवसाचे आत नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते.

## रेखा शाखा

## भाडे प्रकरणे

खाजगी जागेत शासकीय कार्यालये कार्यरत असताना त्यांचे मासिक भाडे ठरविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते. सदर शासकीय कार्यालयाने विहित नमुन्यात प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याची उपविभागामार्फत तपासणी होवून, उपविभागामार्फत पूर्ततेसह प्राप्त झालेला भाडे प्रकरणाचा प्रस्ताव १५ दिवसात मंजूर केला जातो. तसेच सदर शासकीय कार्यालयाना त्यांच्या मागणीनुसार जागा उपलब्ध नसल्याचे प्रमाणपत्र १५ दिवसाचे आत दिले जाते.

## मुल्यांकन प्रस्ताव

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अथवा संबंधित जागा मालकाकडून प्रॉपर्टीचे मुल्य ठरविण्याबाबतचे प्रस्ताव हे उप विभागाकडून कागदपत्रांची पूर्तता करुन घेवून सादर केल्यानंतर १५ दिवसाच्या आत मुल्यांकन प्रस्ताव तयार करुन दिले जातात.

## सिनेमागृह / व्हिडीओ / सर्कस यांची वार्षिक तपासणी

सिनेमागृह / व्हिडीओ येथील प्रेक्षकगृहांची वार्षिक तपासणी करुन त्या-त्या वर्षासाठी नुतनीकरण करुन देण्याबाबतचे संबंधितांमार्फत प्रस्ताव आल्यानंतर ते प्रस्ताव उपविभागाकडे तपासणीसाठी पाठवले जातात व प्रत्यक्ष पहाणी झाल्यानंतर उपविभागाकडे तपासणी शुल्क रु ५००/- जमा करुन (नमुना-५ शासनास प्रदान केलेल्याची पावती) विभागीय कार्यालयात प्रस्ताव प्राप्त झालेनंतर ना हरकत दाखला (त्या-त्या वर्षाचा) देण्यात येतो.

## स्टेज परवानगी

राष्ट्रपती, राज्यपाल, आमदार, खासदार अथवा मान्यवर व्यक्तीचे होणारी सभास्थाने येथील स्टेज, मजबूतीकरणाबाबतचे प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय / जिल्हाधिकारी कार्यालय अथवा अन्य शासकीय कार्यालये अथवा संस्था, संघटना यांच्या कडून प्राप्त झाल्यावर ती उपविभागामार्फत स्टेज मजबूतीकरणाचे प्रस्ताव आठ दिवसाचे आत किंवा निकडीनुसार त्वरीत एका दिवसात दिले जातात.

## जमीन बिगरशेती करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र

रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतजमीन बिगरशेती करण्यासाठी संबंधीताकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी करुन अर्जदारास ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

## पाईप लाईन क्रॉसिंग प्रस्ताव

शेतकरी/खाजगी संस्था/सरकारी संस्था यांचेकडून रस्ता ओलांडून पाईपलाईन करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावातील कागदपत्रांचे पडताळणी करण्यात येवुन प्रत्यक्ष जागेची पहाणी केल्यानंतर रस्त्याचे होणारे नुकसान व रस्ता पुर्वव्रत करण्यासाठी येणारा खर्च प्रचलित नियमानुसार आकारुन रक्कम भरल्यानंतर प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

## केबल क्रॉसिंग प्रस्ताव

ओ.एफ.सी. / टेलिफोन केबल रस्त्यांच्या बाजुने /रस्ता क्रॉस करणेबाबतचा प्रस्ताव संबंधीताकडून प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावातील कागदपत्रांची छाननी करण्यात येते. केबल टाकल्यानंतर रस्ता पुर्वव्रत करण्यासाठी येणारी अंदाजित रक्कम संबंधीतास कळविण्यात येते आणि त्या रक्कमेची बँक गॅरंटी काम सुरु करण्यापुर्वी भरुन घेण्यात येते. त्यानंतर केबल टाकण्यास प्रचलित नियमान्वये कार्यवाही करण्यात येते.

## जोडरस्ते परवानगी प्रकरणे (पेट्रोल पंप /ढाबे/हॉटेल्स इ. )

संबंधीताकडून पेट्रोल पंप जोडरस्ता प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रथम आयआरसी १२-१९८३ च्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे का? याची पडताळणी करुनच पुढील कार्यवाही करण्यात येते. ढाबे / हॉटेल्सच्या जोडरस्त्यासाठी पथकिनारवर्ती नियमानुसार प्रस्तावाची छाननी करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.

## रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत दाखला

अशा प्रकरणी पथकिनारवर्तीच्या प्रचलित नियमानुसार इमारत रेषा/नियंत्रण रेषा बाबत पडताळणी करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.

## सरकारी इमारतींचे ना उपलब्धता प्रमाणपत्र

याबाबत इतर शासकीय खात्याकडून सरकारी इमारत त्यांच्या कार्यालयासाठी वा इतर प्रयोजनासाठी उपलब्ध नसल्याबाबतची खात्री करण्यात येऊन त्यानंतर प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

## अंतराचे दाखले

अंतराचे दाखले या खात्याकडून मिळणेकरिता बहुतकरुन शासकीय अन्नधान्य पुरवठा अधिकारी यांचेकडून मागणी करण्यात येते. याबाबत संबंधीतानी मागणी केलेल्या मार्गाचे अंतर विभागीय कार्यक्षेत्रातील मार्गाचे अंतर देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

## <u>लेखा शाखा- कामाचे स्वरूप व जबाबदारी (सनद)</u>

विभागीय कार्यालयाच्या लेखा शाखेमध्ये खालीलप्रमाणे प्रमुख कामे केली जातात. (१) अर्थसंकल्प, (२) निविदा निश्चिती, (३) लेखापरीक्षण- कामांची देयकांची पडताळणी करणे, (४) मासिक लेखा तयार करून महालेखापालांना सादर करणे व खर्च विषयक अभिलेखे ठेवणे. ही कामे महाराष्ट्र सा.बां. नियमावली, महाराष्ट्र सा.बां. लेखा संहिता यात निर्दिष्ट केलेल्या व शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार पार पाडावी लागतात.

उपरोक्त कामे लेखाशाखेतील कार्यासन धारक, लिपिकांकडून त्यांना कार्यालय प्रमुखांकडून ठरवून दिलेल्या कार्यभारानुसार केली जातात. ही कामे शासनाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार व ठराविक कालावधीत करावी लागतात. विभागीय लेखापालाच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली लेखा शाखेतील कामे केली जातात.

## <u>विभागीय लेखापालाची कर्तव्ये</u>

महाराष्ट्र सा.बां. लेखासंहितेच्या परिच्छेद ४.२.२ मध्ये नमुद केल्यानुसार खालील तीन, प्रकारची कामे पार पाडावी लागतात.

१) विभागात झालेल्या खर्चाच्या लेख्याचे संकलन करणे.

२) प्रारंभिक लेखे, प्रमाणके यांच्या तपासणीवर नियंत्रण ठेवणे.

३) सर्व वित्तीय बाबतीत कार्यकारी अभियंता यांना वित्तीय बाबतीत सल्ला देणे.

लेखा शाखेतील कामे खालील तपशीलानुसार पार पाडली जातात.

### (१) वित्तीय अर्थसंकल्प - कार्यासन क्र. लेखा-२

सर्व उपविभागांकडील कामांसाठी विविध लेखाशिर्षाखाली पुढील वर्षासाठी अनुदान मागणी करणे. चालू वर्षी आठमाही अंदाजपत्रक व फेब्रुवारी अखेर फेरआढावा घेऊन सुधारीत मागणी करणे.

**(२) निविदा निश्चितीबाबत कार्यवाही - कार्यासन क्र.४**

खालील कामांसाठी निविदा निश्चितीची कार्यवाही केली जाते. (सा.बां. नियमावली परिच्छेद १८८ ते २३४ व परिशिष्ट १२ व १३ नुसार)

**(अ)** महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्यांसाठी बांधवयाच्या इमारतींची कामे.

**(ब)** शासनाची निवासी व निवासेत्तर इमारतींची देखभाल व दुरूस्ती.

**(क)** स्थानिक स्वराज्य संस्था व शासनाची इतर ठेव बांधकामे.

| **मुद्दा क्र.** | **कामाचे स्वरूप** | **लागणारा सर्वसाधारण कालावधी.** |
|---|---|---|
| २.१ | तांत्रिक शाखेकडून प्राप्त झालेल्या प्रारूप निविदेची लेखा शाखेत पडताळणी करून मंजूरीस सादर करणे.<br>अ) देखभाल दुरूस्तीच्या कामांसाठी रू. १५.०० लक्ष किंमतीची<br>ब) मुळ बांधकामे व रू. १५.०० लक्षच्या वरील किंमतीची | <br><br>५ दिवस<br>८ दिवस |
| २.२ | मंजूर झालेल्या प्रारूप निविदेसंबंधी<br>अ) रू. १५.०० लक्ष पर्यंतच्या कामांना ती बेरोजगार अभियंता/मजूर सहकारी संस्थांना देण्यासाठी शिफारस मागविणे.<br>ब) रू. १५.०० लक्षच्या कामांसाठी स्पर्धात्मक निविदा मागविणे (निविदा सुचना प्रसिध्दीस देण्यासाठी मसुदा तयार करणे) प्रसिध्दीस पाठविणे.<br>क) रू. १५.०० लक्षच्या वरील कामांसाठी निविदा सूचनेचा मसुदा तयार करणे व प्रसिध्दीस पाठविणे. | <br>८ दिवस<br><br>८ दिवस<br><br>८ दिवस |
| २.३ | प्रारूप निविदेनुसार निविदा संचाची प्रत तयार करणे व पडताळणी करणे.<br>अ) बेरोजगार अभियंता/मजुर सहकारी संस्थेस देण्यासाठी<br>ब) स्पर्धात्मक निविदा बोलावण्यासाठी प्रति तयार करणे. | <br><br>८ दिवस<br>१५ दिवस |

| मुद्दा क्र. | कामाचे स्वरूप | लागणारा सर्वसाधारण कालावधी. |
|---|---|---|
| २.४ | कंत्राटदारांकडून निविदा संच विकत घेण्यास प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करणे व प्रथम लिपीक यांच्याकडे निविदा फी स्विकारण्याची सूचना टिप्पणी पाठविणे व त्यानुसार निविदा संच कंत्राटदारांना देणे. | ८ दिवस |
| २.५ | रू. ५०.०० लक्ष वरील कामांसाठी निविदा पुर्व बैठकीस उपस्थित राहून उपस्थित मुद्द्यांबाबत स्पष्टीकरण मसुदा व सीएसडी **(Common set of deviations)** मसुदा तयार करून सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेणे. | ८ दिवस |
| २.६ | अ) सीलबंद निविदा स्विकारणे.<br>अ-१ विभागीय कार्यालयात (रू. ५०.०० लक्ष किंमतीपर्यंत) सीलबंद निविदा स्विकारून कंत्राटदारास पोच पावती देणे<br>अ-२ सीलबंद निविदा क्रमवार उघडणे व पडताळणी करणे.<br>ब) मंडळ कार्यालयात रू. ५०.०० लक्ष वरील.<br>ब-१ निविदा संच विकत घेतलेल्या कंत्राटदारांची यादी मंडळ कार्यालयास सादर करणे.<br>ब-२ सीलबंद निविदा उघडते वेळी उपस्थित राहून कागदपत्रांची पडताळणी करण्यास सहाय्य करणे. | निविदा स्विकृतीच्या दिवशीच<br>स्विकृतीच्या १ दिवस अगोदर<br>१ दिवस |
| २.७ | उघडलेल्या निविदांबाबत तुलनात्मक तक्ता पडताळून आवश्यक तेंव्हा दर वाटाघाटीने कमी करण्याबाबत कंत्राटदारांशी पत्रव्यवहार करणे. | **८ दिवसात** |
| २.८ | सर्वात कमी दराची तुलना चालू दरसूचीनुसार येणाऱ्या दराशी करून निविदा मंजूरीचा प्रस्ताव विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्यास सादर करणे.<br>अ) विभागीय स्तरावर<br>ब) वरीष्ठ कार्यालयास सादर करणे. | **निविदा उघडल्यानंतर**<br>**८ दिवसांत**<br>**१५ दिवसांत** |

| मुद्दा क्र. | कामाचे स्वरूप | लागणारा सर्वसाधारण कालावधी. |
|---|---|---|
| २.९ | निविदेस स्विकृती प्राप्त झाल्यावर त्याबाबत कंत्राटदारास कळवून अनामत रक्कम भरण्याबाबत पत्रव्यवहार करणे. | **८ दिवस** |
| २.१० | कामाच्या तातडीनुसार व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार कंत्राटदाराने अनामत रक्कम भरल्यानंतर काम सुरू करण्याचे आदेश देणे व आदेशाची प्रत व निविदेची प्रमाणित प्रत कंत्राटदार, उपविभाग, लेखापरिक्षक ह्यांना देणे. मंजूर निविदेच्या नोंदवहीत निविदेची नोंद घेणे. | **१५ दिवस** |
| २.११ | मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरण प्रस्ताव म. स. संस्थांचे अर्ज प्राप्त झाल्यावर त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करून मंडळ कार्यालयास सादर करणे. | **८ दिवस** |
| २.१२ | मंडळ कार्यालयाकडून प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्यावर संस्थेस वर्गीकरण प्रमाणपत्र देणे. | **८ दिवस** |

## (३) उपविभागांचे लेखा परीक्षण व देयकांची पडताळणी.

विभागांतर्गत विविध उपविभागांनी केलेल्या खर्चाचा लेखा विभागास दरमहा सादर केला जातो. त्या लेख्याच्या लेखा परीक्षणाचे काम तसेच उपविभागांमार्फत झालेल्या कामांची देयके पडताळणी करणे. ही कामे खालीलप्रमाणे कार्यासनांकडून (लेखापरीक्षक) करण्यात येतात.

| अ.क्र. | उपविभागाचे नाव | कार्यासन क्रमांक |
|---|---|---|
| १. | सा.बां. उपविभाग बार्शी | लेखा- बार्शी |
| २. | सा.बां. उपविभाग कुर्डूवाडी | लेखा- कुर्डूवाडी |
| ३. | सा.बां. उपविभाग मोहोळ | लेखा- मोहोळ |
| ४. | रोहयो (सा.बां.) उपविभाग , बार्शी | लेखा- रोहयो बार्शी |

उपविभागांचा मासिक लेखा मागील महिन्याच्या २१ तारखेपासून चालू महिन्याच्या २० तारखेपर्यंतच्या व्यवहाराचा संकलित केला जातो. व तो विभागास दिनांक २१ ते २५ या कालावधीत सादर केला जातो.

### लेखापरिक्षण

उपरोक्त उपविभागांचे मासिक लेखे विभागास प्राप्त झाल्यावर प्रत्येक लेखापरीक्षकांकडून त्यांची पडताळणी खालीलप्रमाणे केली जाते.

| मुद्दा क्र. | कामाचे स्वरूप | लागणारा सर्वसाधारण कालावधी. |
|---|---|---|
| ३.१ | महाराष्ट्र सा.बां. लेखा संहितेचे परिच्छेद २०.१.१ ते २१.१.७ व २२.२.१ ते २२.२.११ मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उपविभागांनी सादर केलेले लेखे परीपुर्ण आहेत अथवा नाहीत ह्यांची पडताळणी करणे. | **७ दिवस** |

| मुद्दा क्र. | कामाचे स्वरूप | लागणारा सर्वसाधारण कालावधी. |
|---|---|---|
| ३.२ | निदर्शनास आलेल्या त्रुटींची पुर्तता करून घेण्यासाठी उपविभागास लेखा परीक्षण टिप्पणी पाठविणे. | **७ दिवस** |
| ३.३ | पडताळणी केलेले खर्च, गोषवारे, खातेबदल विभागाच्या मासिक लेख्यात समाविष्ट करण्यासाठी वरिष्ठ लेखा लिपिकांकडे देणे. | **७ दिवस** |
| ३.४ | तांत्रिक पडताळणी होऊन प्राप्त झालेली देयके व मापन पुस्तके यांची वित्तीय बाबतीत तपासणी करणे. (निविदा शर्तीनुसार देयकातील रक्कम प्रदानास पात्र आहे अथवा नाही ते पहाणे तसेच महाराष्ट्र सा.बां. लेखा संहिता परिच्छेद १०.२.९ ते १०.३.८ मधील तरतुदींची पुर्तता होते अथवा नाही ते तपासणे.)<br>अ) देखभाल दुरूस्तीची सुमारे रू. १५ लक्षपर्यंतच्या किंमतीची देयके वरीलप्रमाणे तपासणे. | **७ दिवस** |
| ३.५ | ब) मोठी देयके तपासणे. | १५ दिवस |
| ३.६ | महिना अखेर बांधकामांचे गोषवारे तयार करणे व बांधकाम नोंदवहीत खर्चाची नोंद करणे. | ७ दिवस |
| ३.७ | कामास मुदतवाढ/नुकसान भरपाईचा प्रस्ताव सादर करणे/ वाढीव खर्चास मंजुरीचा प्रस्ताव सादर करणे/ मंदगतीबाबत कंत्राटदारास नोटीस देणे / उपविभागाकडे कामांच्या प्रगतीबाबत पत्रव्यवहार करणे. | प्रत्येक प्रकरण प्राप्त झाल्यावर / उद्‌भवल्यावर ७ दिवसात |
| ३.८ | आयकर कपातीचे/ मुल्यवर्धित कर कपातीचे प्रमाणपत्र तसेच काम केल्याचे प्रमाणपत्र कंत्राटदारांना देणे. | पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत |
| ३.९ | मासिक लेख्यासंबंधी विविध अनुसूचि तयार करणे. (प्रपत्र क्रमांक ९१ व मूळ प्रमाणके जोडणे वगैरे) | ७ दिवस |

**(४)  मासिक लेखा संकलन करणे व महालेखापालांना सादर करणे.**

महाराष्ट्र सा.बां. लेखासंहितेच्या परिच्छेद क्र. २२.४.१ ते २२.४.२८ नुसार विभागाच्या मासिक लेख्यासंबंधी अनुषंगिक कामे. लेखा संकलनाचे काम शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांना एकत्रितपणे करावे लागते. संकलित लेखा महालेखापाल, नागपूर यांना दरमहा दिनांक  ७ ते १० या दरम्यान पाठवावा लागतो.

| **मुद्दा क्र.** | **कामाचे स्वरूप** | **लागणारा सर्वसाधारण कालावधी.** |
|---|---|---|
| ४.१ | धनादेश काढणे.- सा.बां. लेखासंहिता प्रकरण ६ नुसार<br>लेखा-१ कार्यकारी अभियंता यांनी मंजूरी दिलेल्या देयकांचे प्रदान करण्यासाठी अर्थसंकल्प वित्तीय प्रणालीद्वारे प्राधिकार पत्र काढणे. व त्यानुसार धनादेश तयार करणे. | अनुदान व अर्थसंकल्प वित्तीय प्रणाली (बीडीएस) उपलब्धतेनुसार ५ दिवसात. |
| ४.२ | लेखा-८ पुर्ण झालेल्या कामांसंबंधी कंत्राटदारांच्या ठेवी परत करण्याची कार्यवाही | ७ दिवसात |
| ४.३ | लेखा-८ व्याजी प्रतिभुति -नोंदवही-नोंदी घेणे. | ७ दिवसात |
| ४.४ | लेखा-६ आयकर विवरणपत्र त्रैमासिक करणे. | ७  दिवस |
| ४.५ | लेखा-६ मुल्यवर्धित कर त्रैमासिक विवरणपत्र करणे. | ७ दिवस |

## विभागीय कार्यालयातील आस्थापना शाखेची कामे

विभागीय कार्यालयाच्या आस्थापना शाखेचे सर्व कामकाज प्रमुख लिपीक यांच्या नियंत्रणा खाली वरिष्ठ लिपीक / कनिष्ठ लिपीक करतात. आस्थापना शाखेतील कामाची विभागणी करण्यात आलेली असुन त्यानुसार ......

१) टपाल नोंदणी (टपाल आवक / जावक),

२) आस्थापना पत्रव्यवहार

३) टंकलेखन (संगणक शाखा)

४) आस्थापना लेखा- १/ लेखा- २

५) वेतन

६) भाडेशाखा

अशी कामे करण्यात येतात. तसेच या शाखेकडून शासकीय विश्रामगृह आरक्षणाचे काम देखिल करण्यात येते. शासकीय विश्रामगृहाची व त्यांचे आरक्षणाबाबतची माहिती स्वतंत्ररित्या नमुद केलेली आहे.

टपाल नोंदणी मध्ये कार्यालयास प्राप्त झालेल्या सर्व पत्रांच्या आवक नोंदवहीत नोंदी घेवून पुढील कार्यवाहीसाठी संबधित शाखेकडे पाठवले जाते. तसेच कार्यवाही पुर्ण झालेल्या कागदपत्रांची जावक नोंदवहीत नोंद घेवून अशी पत्रे संबधितांना पाठवली जातात. अशा प्रकारे कार्यालयास प्राप्त होणारी व पाठवण्यात येणारे टपाल या नोंदणी विभागात विविध नोंदवहयात नोंदवले जाते.

आस्थापना पत्रव्यवहार यांचेकडून कार्यालयीन कामकाजा संदर्भात सर्व पत्रव्यवहार कर्मचा-यांच्या नियुक्त्या, बदली, रजा अशा सेवाविषयक बाबीचा पत्रव्यवहार करण्यात येतो.

आस्थापना लेखा शाखेकडून कर्मचा-यांचे सेवाविषयक बाबींचा लेखा तयार करण्यात येतो, उदा.सेवापुस्तके, भविष्य निर्वाह निधी इत्यादी, तसेच सेवानिवृती विषयीचा पत्रव्यवहार या शाखेकडून करण्यात येतो.

वेतनशाखेकडून अधिकारी / कर्मचा-यांची वेतनदेयके कोषागारास सादर करुन त्यांचे वेतन / भत्ते देण्याची कार्यवाही केली जाते.

## विश्रामगृह / विश्रामधाम या बाबतची माहिती

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२.सोलापूर यांचे अधिपत्या खालील विश्रामगृह व विश्रामधामाची सविस्तर माहिती सोबतचे प्रपत्रात दर्शविली आहे. या विश्रामगृहाची देखभाल संबधित उप अभियंता यांचे कडून करण्यात येते तर दैनंदिन व्यवस्था तेथील नियुक्त केलेल्या शाखा अभियंता यांचे कडून करण्यात येते. या विश्रामगृहाचे आरक्षण शासन निर्णय क्रमांक आरक्षण-२००१/प्रक्र१२६/मिव्य-२ दिनांक ३१/७/२००३ अन्वये दिलेल्या आदेशानुसार अटी/शर्तीचे पालन करुन देण्यात येते. या अटी/शर्ती खालील प्रमाणे आहेत.

**अ) विश्रामकक्षाचे आरक्षण करतांना खालील प्रमाणे अग्रकमानुसार देण्यात येते.**

१) महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल,

२) राज्याचे मुख्यमंत्री,

३) विधानपरिषदेचे सभापती / विधान सभा अध्यक्ष / उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमुर्ती,

४) लोक आयुक्त,

५) माननीय मंत्री महोदय,

६) उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती ,

७) विधान परिषदेचे उप सभापती / विधान सभेचे उपाध्यक्ष,

८) माननीय राज्यमंत्री,

९) विधान मंडळाच्या समित्यांचे सभासद,

१०) लोकप्रतिनिधी (खासदार / आमदार),

११) राज्य शासनाचे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी / कर्मचारी,

१२) केद्र शासनाचे शासकीय कामा निमित्त दौ-यावर असणारे अधिकरी / कर्मचारी,

१३) राज्य शासनाचे कामावर नसतांना येणारे अधिकारी / कर्मचारी,

१४) इतर राज्य शासनाचे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी/ कर्मचारी,

१५) माजी खासदार/आमदार/स्वातंत्र संग्राम सेनानी/राज्य शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी

१६) अधिस्विकृत पत्रकार, व

१७) खाजगी व्यक्ती

ब) कक्षबंधाचे आरक्षण जास्तीत जास्त सात दिवसापर्यंत करण्यात येते

क) तातडीच्या प्रसंगी कार्यालयीन वेळेनंतर अथवा सुट्टीचे दिवशी कक्ष आरक्षण / उपलब्धते बाबत संबंधित विश्रामगृहाचे उपअभियंता / शाखाअभियंता / विश्रामगृह व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा, कक्ष उपलब्ध असल्यास नियमानुसार कक्ष उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करणेत येते.

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२.सोलापूर**
**यांच्या अधिपत्यातील शासकीय विश्रामगृहे**

| अ.क्र | विश्रामगृहाचे नांव | एकूण कक्षबंधाची संख्या | | | विश्रामगृहाचा पत्ता व दूरध्वनी क्र. | आरक्षणासाठी संबंधित अधिकारी यांचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | साधे | व्हिआयपी | एकूण | | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १ | शासकीय विश्रामगृह बार्शी | २ | २ | ४ | मु.पो.ता.बार्शी जामगाव रोड ०२१८४/२२२७५० | कार्यकारी अभियता सा.बां. विभाग क्र.२.सोलापूर दुरध्वनी क्रमांक ०२१७/२३१२३०२ |
| २ | शासकीय विश्रामगृह, मोहोळ | २ | - | २ | मु.पो.ता.मोहोळ एस.टी.स्टॅन्डजवळ ०२१८९/२३२२६३ | कार्यकारी अभियता सा.बां. विभाग क्र.२.सोलापूर दुरध्वनी क्रमांक ०२१७/२३१२३०२ |
| ३ | शासकीय विश्रामगृह, माढा | २ | - | २ | मु.पो.ता.माढा जि.सोलापूर ०२१८३/२२३३६३ | कार्यकारी अभियता सा.बां. विभाग क्र.२.सोलापूर दुरध्वनी क्रमांक ०२१७/२३१२३०२ |
| ४ | शासकीय विश्रामगृह कुर्डूवाडी,ता.माढा | २ | १ | ३ | मु.पो.कुर्डूवाडी, बार्शी रोड, ०२१८३/२२३३६३ | कार्यकारी अभियता सा.बां. विभाग क्र.२.सोलापूर दुरध्वनी क्रमांक ०२१७/२३१२३०२ |

# गृहवाटप समिती / उपसमितीचे कामकाज

## १) गृहवाटप समिती

गृहवाटप समितीच्या कामकाजाचे निर्णय अध्यक्ष, गृहवाटप समिती तथा विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे हे घेतात. समितीच्या कामकाजात खालीलप्रमाणे वेतन गट येतात.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वेतनगट १ अ | रु.१८४०१/- चे पुढे | १८० चौ.मी.चटई क्षेत्र |
| २) | वेतनगट-१ | रु.१६५०१/- ते रु.१८४००/- | १४० चौ.मी.चटई क्षेत्र |
| ३) | वेतनगट-२ | रु.१५८५१/- ते रु.१६५००/- | ११५ चौ.मी.चटई क्षेत्र |
| ४) | वेतनगट-३ | रु.१०५०१/- ते रु.१५८५०/- | ७७ चौ.मी.चटई क्षेत्र |

## २) गृहवाटप उपसमिती

गृहवाटप उपसमितीच्या कामाकाजाचे निर्णय अध्यक्ष गृहवाटप उपसमिती तथा जिल्हाधिकारी, सोलापूर हे घेतात. उपसमितीच्या कामकाजात खालीलप्रमाणे वेतनगट येतात.

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | वेतनगट ४ | रु.८००१/- ते रु.१०५००/- | ५० चौ.मी.चटई क्षेत्र |
| ६) | वेतनगट-५ | रु.४४०१/- ते रु.८०००/- | ४४ चौ.मी.चटई क्षेत्र |
| ७) | वेतनगट-६ | रु.४४००/- पर्यंत | ३४ चौ.मी.चटई क्षेत्र |

| मुद्दा क्र. | कामाचे स्वरूप | लागणारा सर्वसाधारण कालावधी. |
|---|---|---|
| १. | गृहवाटप समितीकडून शासकीय निवासस्थान वाटपाचे आदेश दिल्यानंतर, कर्मचारी/अधिकारी कार्यरत असलेल्या कार्यालयास वेतनातून भाडे वसुली करण्याबाबत रक्कम कळविणे. | २ दिवसात |
| २. | सर्व निवासस्थानांची भाडेवसुली दरमहा होत असल्याबाबत भाडे वसुली तक्ते संबंधित कार्यालयांकडून प्राप्त झाल्यावर वसुलीच्या नोंदवहीत नोंद घेणे. | ५ दिवसात |
| ३. | थकीत वसुलीबाबत संबंधीतांना व त्यांच्या कार्यालयाकडे भाडे वसुलीबाबत पाठपुरावा करणे. | प्रकरण उद्‌भल्यावर ७ दिवसात |
| ४. | बदली/ सेवानिवृत्ती आदी प्रकरणी निवासस्थान विहित काळात रिक्त न केल्यास निष्कासनाची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्यास (जिल्हाधिकारी) सादर करणे. | प्रकरण उद्भवल्यावर ७ दिवस |

## माहिती अधिकार अधिनियम - २००५ प्रकरणे

अ) माहिती अधिकारात आलेले अर्ज हे विभागीय कार्यालयाशी संबंधित माहिती असेल तर संबंधित कर्मचा-यांकडिल माहिती एकत्रित करुन अर्जदारास ३० दिवसाचे आत माहितीबाबत, शुल्क भरण्यास कळविले जाते अथवा माहिती पाठविली जाते

ब) माहिती अधिकारात आलेले अर्ज हे ब-याच वेळेस इतर प्राधिकरणाशी संबंधित असल्यास माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम (३) खाली ५ दिवसाचे आत वर्ग करणेत येतो.

क) माहिती अधिकारात आलेले अपील अर्जावर अपील सुनावणी ही तीस दिवसाचे आत घेवून निर्णय दिला जातो.

# भांडार शाखा

विभागातील भांडाराचा संग्रह हा भांडारपाल यांच्या प्रभाराखाली ठेवण्यात येतो सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे तीन भागात कार्य करावे लागते.

**अ)** भांडारे संपादन करणे.

**ब)** भांडारे ताब्यात ठेवणे व आवश्यकतेनुसार वितरण करणे.

**क)** विल्हेवाट लावणे.

**ड)** भांडाराची सुरक्षा व त्याचा हिशोब विविध नोंदवह्यात ठेवणे.

विभागाच्या अधिपत्याखाली उपविभागीय कार्यालये कार्यरत असतात. या कार्यालयांना सोपविलेल्या बांधकामांसाठी सिमेंट, स्टिल व पातळ व बंदिस्त डांबराची आवश्यकता असते. यासाठी उपविभागाकडून सर्वसाधारणपणे मागणी घ्यावी लागते.

प्राप्त मागणीनुसार संबंधीत शासनमान्य पुरवठादारांकडून उदा. सिमेंटसाठी सिमेंट कॉर्पोरशेन ऑफ इंडिया, स्टीलसाठी स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया किंवा टाटा आर्यन स्टील कंपनी, पातळ व बंदिस्त डांबर खदेरीसाठी मे. हिंदुस्थान पेट्रो, भारत पेट्रो व इंडियन ऑईल कं. यांकडे पुरवठा आदेश पाठवावा लागतो

प्राप्त झालेले भांडारसाहित्य संबंधीत उपविभागास पुरवठा करण्यात येतो.

विभागाकरीता आवश्यक असणाऱ्या हत्यारे व सयंत्रे अशा साहित्याची मागणी उपविभागाकडून मागविण्यात येते.

उपविभागाकडून साहित्याची मागणी यादी विभागास प्राप्त झाल्यानंतर ती एकत्रित करण्यात येते

प्राप्त मागणी एकत्रित करून शासनमान्य पुरवठादार किंवा स्थानिकरित्या दरपत्रके मागवून दर कोटेशन नोटीस पाठवून दरपत्रके मागविण्यात येतात व साहित्य पुरवठादाराने पुरवठा आदेश पाठविल्यापासून ९० दिवसांपर्यंत ग्राह्य धरण्यात येतात.

दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर विभागाद्वारे साहित्याचा पुरवठा आदेश मंजूर प्राप्त करून घेण्यात येते.

प्राप्त साहित्य हे विभागातील भांडारात ठेवण्यात येते व मागणीपत्रानुसार उपविभागात लवकरात लवकर देण्यात येते यासाठी सदरच्या साहित्याची नोंद ही सर्वप्रथम नमुना ३३ (हत्यारे व सयंत्रे जमा विवरणपत्रात) मध्ये घेण्यात येते व विभागात नमुना ३७ **(Ledger of T & P)** मध्ये घेण्यात येते

विभागांतर्गत यांत्रिकी सा.बां. उपविभागास निरीक्षण वाहने व कन्स्ट्रक्शन व्हेईकल्स् यांची उपविभागातील यांत्रिकी कार्यशाळेत दुरूस्ती केली जाते. यासाठी साहित्य खरेदी प्रक्रिया केली जाते.

उपविभागातील वाहनांचे जुने निरूपयोगी साहित्याचा लेखा हा नमुना ६६ **(Dismentalled of Material)** मध्ये उपविभागात ठेवण्यात येतो वाहनांच्या प्राप्त साहित्याची नोंद ही वाहनाच्या हीस्ट्रीशीट मध्ये अद्ययावत ठेवण्यात येते व ज्या वेळेस वाहनांना इंधन साहित्याचा पुरवठा केला जातो तेव्हा त्यांच्या नोंदी वाहनांच्या लॉगबुकात घेतली जातात.

विभागीय कार्यालयाकरीता आवश्यक असणाऱ्या स्टेशनरी साहित्याचे मागणीपत्र मा. व्यवस्थापक, येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय येरवडा पुणे यांचेकडे नमुना क्र. सर्वसा. १६१ म सर्वसाधारण व सा.बां.विभाग मालिकेमधील प्रमाणपत्रांसाठी वार्षिक मागणीपत्र दरवर्षी सप्टेंबर मध्ये सादर करण्यात येते व कार्यालय लेखन सामुग्रीकरीता वार्षिक मागणीपत्र आणि सूचनापत्र (पावती) (विशेष लेखनसामुग्री-२) नमुन्यात दोन प्रतीत सादर करण्यात येते

तसेच जे साहित्य उपरोक्त कार्यालयाकडून प्राप्त होत नाही. त्या साहित्याची खरेदी स्थानिकरित्या दरपत्रके मागवून तव्दत निविदा निश्चिती करून खरेदी करण्यात येते त्याच्या नोंदी ''स्टेशनरी साहित्य रजिस्टर'' मध्ये घेण्यात येतात.

## परिशिष्ठ - क

## कार्यपुर्तीचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | # कार्यपुर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | भाडे निर्धारण | आरेखक | ३० दिवस |
| २ | मिळकत मुल्य निर्धारण | आरेखक | ३० दिवस |
| ३ | सिनेमा/व्हिडीओ/सर्कस नाहरकत प्रमाणपत्र | आरेखक | १५ दिवस |
| ४ | स्टेज तपासणी दाखला | आरेखक | ८ दिवस (तातडीच्या प्रसंगी १ दिवसात) |
| ५ | जमीन बिगरशेती करणेबाबत ना हरकत प्रमाणपत्र | आरेखक | ३० दिवस |
| ६ | अंतराचे दाखले | आरेखक | १५ दिवस |
| ७ | पाईप लाईन क्रॉसिंग रस्ता | आरेखक | ३० दिवस |
| ८ | केबल क्रॉसिंग प्रस्ताव | आरेखक | ३० दिवस |
| ९ | जोड रस्ते प्रस्ताव (पेटो्ल पंप/ढाबे/हॉटेल्स इ. ) | आरेखक | ६० दिवस |
| १० | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | आरेखक | ३० दिवस |
| ११ | सरकारी इमारतींचे ना उपलब्धता प्रमाणपत्र | आरेखक | १५ दिवस |

| अ.क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | # कार्यपुर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १२ | ठेकेदार नोंदणी | | |
| | १) सुशिक्षित बेरोजगार अभियंता (नोंदणी वर्ग अ ) | उप कार्यकारी अभियंता | ८ दिवसात वरिष्ठ कार्यालयास पाठवले जाईल |
| | २) ठेकेदार नोंदणी वर्ग- १ ते ७ | उप कार्यकारी अभियंता | वरिष्ठ कार्यालयास १५ दिवसात सादर करणार वरिष्ठ कार्यालयाची मंजूरी मिळाल्यानंतर ८ दिवसात नोंदणी दाखला देण्यात येईल. |
| | ३) ठेकेदार नोंदणी वर्ग- ८ ते ९ | उप कार्यकारी अभियंता | १५ दिवसात |

**#** कार्यपुर्तीचा कालावधी हा प्रत्येक प्रकरणाची सर्व कागदपत्रे परिपूर्ण असतील व नोंदणीशुल्काचा भरणा केल्यानंतरचा आहे.

# ❖ कार्यपूर्तीचे वेळापत्रक (परिशिष्ट-क)

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे कार्यालय | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कंत्राटदार वर्ग १ अ, १ ब,१क, २ व ३ यांची नोंदणी व नुतनीकरण | सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई | ७५ दिवस | -- |
| २ | कंत्राटदार वर्ग ४ व वर्ग ४ (अ) नोंदणी व नुतनीकरण | मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, पुणे | ६० दिवस | शासन |
| ३ | कंत्राटदार वर्ग ५,६,७ आणि बेरोजगार अभियंतांचे नोंदणीकरण व मजूर सह.संस्था वर्ग अ यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, सोलापूर | ३० दिवस | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे. |
| ४ | कंत्राटदार वर्ग ८ व ९ आणि मजूर सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र.२, सोलापूर | ३० दिवस | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर. |
| ५ | विश्रामगृहाचे आरक्षण | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र.२, सोलापूर | ७ दिवस उपलब्धतेनुसार | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर. |
| ६ | रस्त्याचा कडेला असलेल्या नियोजित इमारतीना किंवा जमीन बिगरशेती करण्यासाठी ना-हरकत दाखला | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र.२, सोलापूर | ३० दिवस | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर. |
| ७ | अंतराचा दाखला | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र.२, सोलापूर | १५ दिवस | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर. |
| ८ | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी ना-हरकत पत्र | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर. | ३० दिवस | मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, पुणे |
| ९ | चलत चित्रपटगृहांचे/लोकनाटय कला केंद्रांचे इमारत योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र.२, सोलापूर | १५ दिवस | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर. |
| १० | सरकारी इमारत ना उपलब्धता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र.२, सोलापूर | १५ दिवस | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर. |
| ११ | इमारत भाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र.२, सोलापूर | ३० दिवस | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर. |

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे कार्यालय | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १२ | इमारतीचे मुल्यनिश्चितीकरण | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र.२, सोलापूर | ३० दिवस | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर. |
| १३ | पेट्रोल पंप आणि पेट्रोलपंपाच्या पोचमार्गाचे परवानगी | सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई | ६० दिवस | -- |

❖ **टीप :-**

१. सदरचे कार्यालय बार्शी, माढा व मोहोळ तालुक्यांचे संबंधीत असून या तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग व जिल्हा परिषदेकडील रस्ते वगळून आहेत.

२. अर्जासोबत विहीत दस्ताऐवज व आवश्यक कागदपत्रे जोडणे गरजेचे आहे. सर्व कागदपत्राची पुर्तता केल्यानंतरच्या तारखेपासून वरीलप्रमाणे कालावधीची मर्यादा अंमलात राहील. यांची कृपया नोंद घ्यावी.

३. कार्यपूर्ती कालावधी मर्यादा सुट्टीचे दिवस वगळून आहेत.

४. सर्व वर्गाच्या नोंदणी व नुतनीकरण करणेसाठी अर्ज येथे स्विकारण्यांत येतात.

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर.**

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२.सोलापूर यांचे अधिपत्या खालील उप विभागीय  कार्यालयाची माहिती**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पत्ता/दुरध्वनी क्रमांक | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | उप अभियंता, सा.बां. उपविभाग बार्शी | सा. बां. उपविभाग बार्शी, जामगाव रोड, ०२१८४/२२२७५० | बार्शी तालुक्यातील राज्य क्षेत्रांतर्गत येणाऱ्या सर्व राज्य रस्त्यांची व प्रमुख जिल्हामार्गाची बांधकामे देखभाल व दुरुस्ती तसेच सर्व शासकीय इमारतीची बांधकामे देखभाल व दुरुस्ती . |
| २ | उप अभियंता, सा.बां. उपविभाग कुर्डूवाडी | सा. बां. उपविभाग कुर्डूवाडी ता. माढा जि.सोलापूर ०२१८४/२२३३६३ | माढा तालुक्यातील राज्य क्षेत्रांतर्गत येणाऱ्या सर्व राज्य रस्त्यांची व प्रमुख जिल्हामार्गाची बांधकामे देखभाल व दुरुस्ती तसेच सर्व शासकीय इमारतीची बांधकामे देखभाल व दुरुस्ती . |
| ३ | उप अभियंता, सा.बां. उपविभाग मोहोळ | सा. बां. उपविभाग मोहोळ, एसटी स्टॅन्ड जवळ, मोहोळ ०२१८९/२३२२६३ | मोहोळ तालुक्यातील राज्य क्षेत्रांतर्गत येणाऱ्या सर्व राज्य रस्त्यांची व प्रमुख जिल्हामार्गाची बांधकामे देखभाल व दुरुस्ती तसेच सर्व शासकीय इमारतीची बांधकामे देखभाल व दुरुस्ती . |
| ४ | उप अभियंता, रोहयो (सा.बां. ) उपविभाग बार्शी | सा. बां. उपविभाग बार्शी आवार, जामगाव रोड, दुरध्वनी क्र. ०२१८४/२२२७५० | बार्शी तालुक्यातील रोहयो व मग्रा रोहयोची सर्व कामे |

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर.**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर.**

## * नागरिकांची सनद *

- वृक्ष तक्ता (**Tree Chart**

